प्रकरण सातवे

# उपसंहार

# प्रकरण सातवे

# उपसंहार

७.१ प्रास्ताविक

७.२ प्रकरणश: सारांश

७.३ समारोप

# प्रकरण सातवे

# उपसंहार

## ७.१ प्रास्ताविक :

प्रस्तुत प्रबंधिकेमध्ये आपण एकूण सात प्रकरणामध्ये अशोक व्हटकर ह्यांच्या 'मेलेलं पाणी' (१९८२) वं '७२ मैल' (१९८९) ह्या दोन कादंबऱ्यांचा चिकित्सक अभ्यास केला आहे. या अभ्यासातून हाती आलेले निष्कर्ष थोडक्यात ह्या प्रकरणात नोंदवावयाचे आहेत. प्रस्तुत सातव्या व शेवटच्या प्रकरणात हे निष्कर्ष मांडत असताना सिंहावलोकनही करणे योग्य होईल.

## ७.२ प्रकरणशः सारांश :

मानव हा आनंदनिर्मितीसाठी व आपल्या स्वप्नांची पूर्तता करण्यासाठी साहित्याकडे वळतो. कादंबरी हा एक महत्त्वाच साहित्य प्रकार आहे. ह्या प्रकाराचे सुद्धा काही उपप्रकार पडतात ते असे. १. सामाजिक, २. ऐतिहासिक, ३. पौराणिक, ४. चरित्रात्मक इ.

**'उपोद्घात'** ह्या पहिल्या प्रकरणात संशोधनविषय निवडण्यामागील भूमिका, वापरलेल्या संशोधन पद्धती व स्वीकारलेले धोरण, प्रबंधिकेची क्रमशः मांडणी ह्या बाबी स्पष्ट केल्या आहेत.

**'मराठी कादंबरीवाङ्.मयाची वाटचाल आणि तिच्यातील दलित कादंबरीकाराचे योगदान'** या दुसऱ्या प्रकरणात मराठी कादंबरीची वाटचाल, दलित कादंबरी आणि दलित कादंबरीकाराचे योगदान दलित साहित्यातील 'कादंबरी' हा वाङ्.मयप्रकार अपुरा असण्याची कारणर्मीमासा पाहिली. त्यानंतर त्या प्रकरणाचा समारोप करुन तिसऱ्या प्रकरणाचा **'अशोक व्हटकर ह्यांच्या कादंबऱ्यामधील अनुभवविश्व'** अभ्यास करता त्या प्रकरणातील 'मेलेलं पाणी' ह्या कादंबरीमधील अनुभवविश्वाचा अभ्यास केला . तसेच '७२ मैल' ह्या कादंबरीमधील अनुभवविश्वाचा अभ्यास केला. **अशोक**

**व्हटकर ह्यांच्या कादंबऱ्यांमधील व्यक्तिरेखा** ह्या चौथ्या प्रकरणामध्ये 'मेलेलं पाणी' ह्या कादंबरीमधील प्रमुख व्यक्तिरेखा आणि गौण व्यक्तिरेखा ह्यांचा अभ्यास केला. तसेच '७२ मैल' ह्या कादंबरीमधील प्रमुख व्यक्तिरेखा आणि गौण व्यक्तिरेखा ह्यांचा अभ्यास केल. प्रकरण पाचव्या मध्ये **'अशोक व्हटकर ह्यांच्या कादंबऱ्यांमधील वातावरणनिर्मिती व भाषाशैली'** अभ्यासताना 'मेलेलं पाणी' ह्या कादंबरीमधील नैसर्गिक, धार्मिक, कौटुंबिक, सामाजिक, राजकीय वातावरण ह्यांचा अभ्यास केला आहे. '७२ मैल' ह्या कादंबरीमधील कौटुंबिक, सामाजिक, भौगोलिक वातावरण ह्यांचा अभ्यास केला. वातावरणनिर्मिती पाहिल्यानंतर भाषाशैलीचा विचार करता सुरुवातीला 'मेलेलं पाणी' मधील भाषाशैलीचा अभ्यास केला. त्यामध्ये कादंबरीकाराची निवेदनाची भाषा, व्यक्तिरेखांच्या तोंडी असलेली संवादाची भाषा, उपमा, प्रतिके, प्रतिमा, शिव्या सदृश्य शब्दांचा वापर, शेतीशी निगडीत शब्द, इंग्रजी भाषेतील शब्द, हिंदी शब्द, संस्कृ त शब्द इ. चा अभ्यास केला. त्यानंतर '७२ मैल' मधील भाषाशैलीचा अभ्यास करताना कादंबरीकाराची निवेदनाची भाषा, व्यक्तिरेखांच्या तोंडी असलेली संवादाची भाषा, म्हणी , वाक्प्रचारांचा वापर, शिव्या सदृश्य शब्दांचा वापर, इंग्रजी भाषेतील शब्द, हिंदी शब्द, संस्कृ त शंब्द इ. चा अभ्यास केला. **'अशोक व्हटकर ह्यांचे मराठी कादंबरीवाङ्.मयातील स्थान'** या सहाव्या प्रकरणामध्ये 'मराठी कादंबरी प्रारंभ ते आजअखेर दलित कादंबरी' अशोक व्हटकर ह्यांचे मराठी कादंबरीवाङ्.मयातील स्थान अभ्यासले. वेगळेपण याचा विचार करताना दलित साहित्यामध्ये दुर्लक्षित असणाऱ्या ढोर समाजाचे चित्रण, दलिताबद्दल असणारी संवेदनशीलता, समर्थपणे दलित समाजाच्या समस्याचे चित्रण, राजकारणामध्ये दलितांच्यावर होणाऱ्या अन्यायाचे चित्रण इ. उपमुद्दयाचा अभ्यास केला.

## ७.३ समारोप :

आपण येथपर्यंत 'अशोक व्हटकर ह्यांचे कादंबरीलेखन' जाणून घेतलो केला. अशोक व्हटकर ह्यांचे कादंबरीलेखन हे दलित साहित्यामधील दलितांच्या समस्या व त्यांचे भारतीय समाजमानसामधील स्थाननिश्चिती ह्यावर नक्कीच उपयोगी पडेल. पूर्णपणे मराठी दलित साहित्यात अशोक व्हटकर ह्यांच्यासारखे दुर्लक्षित कादंबरीकाराचे वेगळेपण सर्व अभ्यासू लोकांना, वाचकांना, माहीत होईल ह्यासाठी मी नम्रपणे हा अभ्यास सादर करीत आहे.

# परिशिष्टे

१. 'अशोक व्हटकर ह्यांचे छायाचित्र '



## २. प्रा.डॉ. अशोक ना. व्हटकर
## जीवन परिचय

**नांव** : अशोक नामदेव व्हटकर

**वडिलांचे नांव** : नामदेव ल. व्हटकर

**जन्मतारीख** : २०/१०/१९४७.
मृत्यू : १६/३/२००१.
**जन्म गांव** : वडगांव, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर

[illegible] :

**धर्म –जात** : हिंदू-ढोर (एस.सी.)

**शिक्षण** : एस.एस.सी.११ वी कोल्हापूर १९६४
बी.ए. स्पेशल संस्कृत १९६८ शिवाजी विद्यापीठ
एम.ए. संपूर्ण संस्कृत १९७१ शिवाजी विद्यापीठ
पीएच.डी. संस्कृत विषय १९८२ शिवाजी विद्यापीठ

**नोकरी तपशिल** : १९७१ जून ते सप्टेंबर ७२ पर्यंत
१. गोपालकृष्ण गोखले कॉलेज कोल्हापूर.
२. ४/१०/१९७२ पासून कायम शासनसेवेत
(३००-६०० श्रेणीत वरिष्ठ अधिव्याख्याता)
१. शासकिय ज्ञान विज्ञान महाविद्यालय औरंगाबाद
१९७२ ते १९७५
२. राजाराम महाविद्यालय, कोल्हापूर १९७५ ते ७७
३. एल्फिन्स्टन कॉलेज, मुंबई १९७७ ते ७९.
४. राजाराम महाविद्यालय, कोल्हापूर १९७० ते ९०
५. विदर्भ महाविद्यालय, अमरावती १९९०ते ९५
६. शासकिय ज्ञान विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद
१९९५ ते २०००

**शिकवलेले विषय** : १९७१ पासून, काव्य, वेदांत, वेद , पुराभिलेख, वाङ्.मय, साहित्य शास्त्र, नाट्यशास्त्र, नाटके इ.विषयी बी.ए. वरिष्ठ वर्गांना शिकवले.

**अनुभव** : १९७१ ते ९९ २९ वर्षे महाविद्यालयीन

**विशेष** : २० वर्षे पदव्युत्तर
महाराष्ट्र राज्य संस्कृत स्थायी समिती (उच्च) व शासननियुक्त

१. सभासद म्हणून शासनास संस्कृत भाषा धोरणाविषयी सल्ला देण्याचे काम केले.

२. शासनातर्फे भाषातज्ञ म्हणून विविध समयी काम केले.
३. आजवर, मुंबई, पुणे, सांगली, औरंगाबाद, नागपूर आकाशवाणी वरुन ३५ ते ४० संस्कृत विद्याविषयक भाषणे केली.
४. शिवाजी विद्यापीठ, अमरावती विद्यापीठ, बा.आ. मराठवाडा विद्यापीठ येथे अनेक वर्षे पेपर्स सेंटर्स समिती अध्यक्ष म्हणून काम केले.
५. भांडारकर ओरि. रिसर्च इन्स्टिट्यूट तर्फे तीन परिषदात निबंध वाचन केले.
६. यवतमाळ, संस्कृत परिषदेत दोन व्याखाने दिली.
७. लखनौ जोधपूर येथे दोन रिफ्रेशर कोर्सेस केले.
८. संस्कृत व इंग्रजी रिफ्रेशर कोर्सेस मध्ये रिसोर्स पर्सन म्हणून लखनौ, नागपूर औरंगाबाद येथे विविध विषयावर भाषणे दिली.
९. संस्कृत भाषा प्रचारासाठी मुंबई येथे संस्कृत नाटकात भूमिका केल्या.
१०. "वैदिक रुद्र देवता" वर विशेष संशोधनासाठी १९८५ मध्ये कैलास-मानस सरोवर प्रवास पूर्ण केला.
११. महाराष्ट्र शासनातर्फे ८६ साली उत्कृष्ट कादंबरीकार म्हणून पुरस्कार प्राप्त झाला.
१२. आजवर अनेक दैनिक, साप्ताहिके, मासिके (हिंदी, इंग्रजी, मराठी, संस्कृत) यामधून संशोधन लेख प्रकाशित झाले आहेत.
१३. कोल्हापूर शहरातील प्रसिद्ध अशा जवाहरनगर हौसिंग सोसायटी प्रशासक, म्हणून सामाजिक काम केले.
१४. विषयतज्ञ या नात्याने विद्यापीठातर्फे प्राध्यापक नियुक्तीचे काम केले.
१५. शिवाजी विद्यापीठाचा पीएच.डी. गाईड ह्या नात्याने काम केले आहे.
१६. मुंबई दूरदर्शनवर कैलास-मानस यात्रे संदर्भात ३० मिनिटांची मुलाखत दिली.

## संशोधन कार्याचा तपशिल

### संशोधनपर पुस्तके - उपलब्ध

१. प्राचीन भारतीय लोकतांत्रिक शासनांचा इतिहास- मयुराज पब्लिकेशन्स पुणे ३० प्रसिद्धी ९५ कि. १०० रु.

२. दाशराज्ञ युद्ध
वेदकालीन घटनेवर संशोधनपर कादंबरी - मनोरमा प्रकाशन मुंबई प्रसिद्धी १९९७ कि. १५० रु.

३. ट्रॉयचे युद्ध
ग्रीक महाकाव्ये इलियड-ओडिसी यांचे सुगम भाषांतर (प्राचीन भारतीय. संस्कृतीच्या अभ्यासासाठी संदर्भग्रंथ) -मनोरमा प्रकाशन मुंबई.

४. महान ओडिन
युरोपातील व्हायकिंग संस्कृतीचे संदर्भ सांगणाऱ्या कथा

५. जगज्जेता
अलेक्झांडरचे संपूर्ण विश्वसनीय चरित्र (चाणक्य मौर्य युगीन भारतावर प्रथमच ग्रीक ग्रंथाच्या आधारे प्रकाश) - मनोरमा प्रकाशन मुंबई प्रसिद्धी ९१ कि. १५० रु.

६. कैलास मानस
वैदिक रुद्र देवाताविषक संशोधन - समाजशिक्षणमाला ४५२ प्रसिद्धी ९१ कि. २ रु.

७. यात्रा रौद्रसुंदराची : कैलास मानस सरोवर प्रवासवर्णन
कोल्हानूर दै. सकाळ रवि. आवृत्तीतून ८६ साली १९ लेख प्रकाशित

८. पैलतीर : दिवाळी अंग १९८६ प्राचीन वैदिक रुद्रपत्राचे सविस्तर उत्तर वेदोध्दारिणी १९८७ वेल्टपटेलनगर दिल्ली.

## आजवर लिहिलेल्या कादंबऱ्या : उपलब्ध
## सध्या उपलब्ध पुस्तकांचा उल्लेख

| | | |
|---|---|---|
| १. मंगळावरचे प्रवासी | : | शास्त्रीय कादंबरी |
| २. आथर्वीय जग | : | वसंत बुकस्टॉल प्रकाशन : १९७४ |
| ३. फॉक्सर | : | (काल्पनिक) मनोरमा प्रकाशन : १९८० |
| ४. पब्लिक | : | (राजकीय) प्रिया प्रकाशन मुंबई : १९८३ |
| ५. अजिंक्य आंबी | : | (सामाजिक) सुयोग प्रकाशन पुणे, दुसरी आवृत्ती १९८३-८४ |
| ६. मेलेलं पाणी | : | (सामाजिक) पॉप्युलर मुंबई महाराष्ट्र शासन पुरस्कार विजेती कादंबरी१९८२ |
| ७. ७२ मैल | : | पॉप्युलर प्रकाशन, मुंबई आत्मचरित्र १९८१. |
| ८. बगाड | : | (सामाजिक) मेहेता प्रकाशन सुयोग प्रकाशन पुणे दुसरी आवृत्ती १९९४ |
| ९. विलक्षण विद्यापती | : | (काल्पनिक) मनोरमा प्रकाशन मुंबई १९९० |
| १०. रासपुतिन | : | रशियन ऐतिहासिक : वसंत बुकस्टॉल प्रकाशन, मंबई १९९३ |
| ११. हव्यवाहन | : | (काल्पनिक) मनोरमा प्रकाशन मुंबई १९९२ |
| १२. गोरी बायको | : | सुयोग प्रकाशन पुणे दुसरी आवृत्ती १९९८ |

| | | |
|---|---|---|
| १३. अश्वमेध | : | (काल्पनिक) मनोरमा प्रकाशन मुंबई १९८८ |
| १४. मी जिवंत आहे | : | दुसऱ्या महायुद्धातील सत्यकथा : दिलीपराज प्रकाशन, पुणे १९९७. |
| १५. खजिन्याच्या शोधात | | |
| ११ समंध काल्पनिक | : | मनोरमा प्रकाशन मुंबई १९९७ |
| १६. महाखवीस | : | (भयकादंबरी) मनोरमा प्रकाशन मुंबई १९६५ इत्यादी. |
| १७. होरपळ | | |
| १८. खुक | | |

१९६९ पासून संदेह, भयविषयक सम्राट अजयशन नावाची कादंबरी मालिका साधारणपणे ३१ पुस्तके लिहिली ती आज उपलब्ध नाहीत.

# संदर्भ सूची

# संदर्भसूची

१. साधनसूची

१. खटकर अशोक, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती : १९८२

२. खटकर अशोक, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई प्रथमावृत्ती : १९८८

## साहाय्यक सूची

१. कवठेकर बाळकृष्ण : 'दलित साहित्य : एक आकलन', अजब पुस्तकालय, कोल्हापूर, आवृत्ती पहिली : १९८१.

२. कुलकर्णी गो.म. 'नवसमीक्षा', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, १९८२.

३. खोले विलास, 'गेल्या अर्धशतकातील मराठी कादंबरी', लोकवाङ्मय गृह, मुंबई, २००२.

३. जाधव रा.ग., 'साहित्य आणि सामाजिक संदर्भ', कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, १९७५.

४. जाधव राजा, 'चितंन', पार्वती बुक क्लब कवडी चंदर, आवृत्ती पहिली : १९८२.

५. ठाकूर रविंद्र, 'मराठी ग्रामीण कादंबरी', स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती : २००१.

६. डोळस वसंत, 'दलित साहित्य : प्रेरणा आणि स्वरुप', दिलीपराज प्रकाशन, पुणे, १९९२.

७. देशपांडे अ.ना., 'आधुनिक मराठी वाङ्.मयाचा इतिहास', खंड २, व्हीनस प्रकाशन, पुणे, तृतीयावृत्ती : १९७९.

८. पवार गो.मा. व हातकणंगलेकर म.द., 'मराठी साहित्य : प्रेरणा व स्वरुप, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, आवृत्ती पहिली: १९८६.

९. 'प्रदक्षिणा', कॉन्टिनेंटल प्रकाशन, सहावी आवृत्ती : १९७६.

१०. फडके भालचंद्र, 'दलित साहित्य : वेदना आणि विद्रोह', श्री विद्या प्रकाशन, पुणे, आवृत्ती दुसरी : १९७७.

११. बांदिवडेकर चंद्रकांत, 'मराठी कादंबरीचा इतिहास', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, १९८९.

१२. बापट प्र. वा. व गोडबोले ना. वा. 'मराठी कादंबरी : तंत्र आणि विकास', व्हीनस प्रकाशन, पुणे तृतीयावृत्ती : १९७३.

१३. यादव आनंद 'मराठी साहित्य : समाज आणि संस्कृती', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, १९८५.

१४. यादव आनंद, '१९६० नंतरची सामाजिक स्थिती आणि साहित्यातील नवे प्रवाह', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे २००१.

१५. लिंबाळे शरणकुमार, 'दलित साहित्याचे सौंदर्यशास्त्र', दिलिपराज प्रकाशन, पुणे, २००४.

१६. [illegible], सोमन अंजली, 'साहित्य आणि सामाजिक संदर्भ', प्रतिमा प्रकाशन, पुणे. १९८९.,

891.463
KAM
T15409